ई-मेल द्वारे

## जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर

---

संदर्भ : दिनांक १३/०९/२०२४ रोजी प्रसिध्द झालेली **शिपाई** पदाकरीताची निवड यादी.

---

**आ दे श :-**

**क्रमांक बी-०४/आस्था.१९/ १८ /२०२४** :- प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर हे खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेत. **सदरचा आदेश दिनांक २८/११/२०२४ रोजी मध्यान्हपूर्व पासून अंमलात येईल.**

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव, निवड यादीतील अनुक्रमांक व पत्ता | नविन नेमणूकीचे कार्यालय. |
|---|---|---|
| १) | श्री. सागर बाबाजी धायतडक, शिपाई पदाच्या निवड यादीवरील उमेदवार **क्र.३६**, राहणार मु. धायतडकवाडी, पो. मोहटे, तालुका पाथर्डी, जिल्हा अहमदनगर. | **नविन नेमणूकीने** तात्पुरत्या स्वरुपात शिपाई सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, **श्रीगोंदा** येथे श्रीमती एस. ए. पाडळकर यांच्या पदोन्नतीमुळे रिक्त असलेल्या पदी. |
| २) | श्री. राहुल प्रदिप कदम, शिपाई पदाच्या निवड यादीवरील उमेदवार **क्र.३७**, राहणार आखेगांव तितर्फा, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर. | **नविन नेमणूकीने** तात्पुरत्या स्वरुपात शिपाई म्हणून दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, अकोले येथे श्री. एस. के. भोर यांचे ऐवजी. |
| ३) | श्री. जिर्तेद्र माधवराव विधाते, शिपाई पदाच्या निवड यादीवरील उमेदवार **क्र.३८**, राहणार माळवणे हॉस्पीटल रोड, कर्पे इस्टेट राहुरी, ता.राहुरी, जि.अहमदनगर. | **नविन नेमणूकीने** तात्पुरत्या स्वरुपात शिपाई म्हणून दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, **राजूर** येथे श्री. योगेश भाउसाहेब बंदावणे यांच्या ऐवजी. |
| ४) | श्री. महादेव ज्ञानोबा बंडापल्ले, शिपाई पदाच्या निवड यादीवरील उमेदवार **क्र.३९**, राहणार मु.पो. भातांगळी, तालुका जिल्हा लातूर. | **नविन नेमणूकीने** तात्पुरत्या स्वरुपात शिपाई म्हणून बदलीने सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, **नेवासा** येथे सौ. ए. आर. बेल्हेकर यांच्या पदोन्नतीमुळे रिक्त असलेल्या पदी. |
| ५) | श्री. सुरज आजिनाथ काकडे, शिपाई पदाच्या निवड यादीवरील उमेदवार **क्र.४०**, राहणार मु. काकडवाडी, पो. पिंपळा, तालुका आष्टी, जिल्हा बीड. | **नविन नेमणूकीने** तात्पुरत्या स्वरुपात शिपाई म्हणून सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, **संगमनेर** येथे श्री.पी.एन.रहाटळ यांच्या पदोन्नतीमुळे रिक्त होणा-या पदी व **प्रतिनियुक्तीने** दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, **राजूर** येथे. |
| ६) | श्री. सिध्देश्वर सखाराम पांगे, शिपाई पदाच्या निवड यादीवरील उमेदवार **क्र.४१**, राहणार मु. पाथरा, पो. युसुफ वडगांव, तालुका केज, जिल्हा बीड. | **नविन नेमणूकीने** तात्पुरत्या स्वरुपात शिपाई म्हणून दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, **कोपरगाव** येथे श्री. मकरंद जगन्नाथ पंडीत यांचे ऐवजी. |

**टिप :-**

१) उपरोक्त उमेदवारांची नेमणूक ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक चारित्र-२०१७/प्र.क्र. ४८३/२०१७/१६-अ, दिनांक २८ ऑगस्ट २०१७ नूसार उमेदवाराची चारित्र व पूर्वचारित्र याची पडताळणीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. **उमेदवाराने सादर केलेली माहिती असत्य आढळून आल्यास प्रस्तुतचा नियुक्ती आदेश रद्दबातल करुन भारतीय दंडसंहितेनूसार फौजदारी कारवाई तसेच शासन सेवेत कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल.**

२) **शिपाई** म्हणुन नविन नेमणूक दिलेल्या कर्मचा-यांची **वेतन स्तर-एस १ (१५०००-४७६००)** मध्ये नेमणूक करणेत आलेली आहे.

३) त्यांना सुचित करणेत येते की, त्यांना दिलेली नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची असुन त्यांना कोणतेही कारण न देता व नोटीस न देता केव्हाही सेवेतुन कमी करणेत येईल.

४) **तसेच,** शिपाई म्हणून तात्पुरत्या स्वरुपात नविन नेमणूक दिलेल्या सर्व उमेदवारांना सुचित करण्यात येते की, हजर झालेनंतर त्यांना त्यांचे पदाचा राजीनामा दयावयाचा असल्यास, एक महिन्याची आगावू लेखी नोटीस अथवा एक महिन्याचे मुळ वेतन इतकी रक्कम भरावी लागेल.

५) तसेच त्यांना असेही सुचित करणेत येते की, ते नेमणुक दिलेल्या न्यायालयात सदर आदेश मिळालेपासून **सात दिवसांचे** आत हजर न झाल्यास त्यांना देण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल व त्यांचे निवड यादीतील नाव कमी करण्यात येईल, याची नोंद घ्यावी

६) **उपरोक्त सुरज आजिनाथ काकडे यांना प्रतिनियुक्तीचा कोणताही भत्ता अनुज्ञेय असणार नाही.**

७) उपरोक्त कर्मचा-यांचा हजर व कार्यमुक्त झालेबाबतचा अहवाल त्वरीत **ईमेल द्वारे** पाठविण्यात यावा

( अंजु शेंडे )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
**अहमदनगर**

जिल्हा न्यायालय, अहमदनगर, ))
दिनांक : २७/११/२०२४. ))

**क्रमांक बी-०४/आस्था.१९/१८/२०२४**

**प्रत माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत :-**

१) संबंधित सर्व माननीय कार्यालय प्रमुख.

२) अधीक्षक, कार्यव्य/ले.व वि., जिल्हा न्यायालय, अहमदनगर.

३) वरिष्ठ लिपिक, कार्यव्यवस्थापन विभाग, जिल्हा न्यायालय, अहमदनगर.

४) कार्यालयीन संचिका.

आदेशावरुन
27/11/24
( सारिका सु. उलाने )
प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय,
अहमदनगर

जिल्हा न्यायालय, अहमदनगर, ))
दिनांक : २७/११/२०२४. ))